

# म. पां. भावे (मधुसूदन पांडुरंग भावे)

## (व्यवहारांत सर्वजण ''मपां'' म्हणून संबोधतात)

ठाण्याचे प्रसिद्ध कवी मधुसूदन पांडुरंग उर्फ म. पां. भावे यांचा जीवनपट पाहिला तर सामान्य परिस्थितीतून उदयाला आलेलं असामान्य व्यक्तीमत्व असाच करावा लागेल.

म. पां. भावे हे गीतकार व कवी म्हणून परिचित आहेत. 'स्वप्नातल्या कळ्यांनो' या गाण्यामुळे ते संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जाऊ लागले. स्वत:चे विविध छंद भाव्यांनी जमेल तसे जोपासले. आपल्या वडिलांच्या सनातन विचारांचा पगडा भाव्यांच्या मनावर सुरूवाती पासून होता. त्यामुळेच त्यांचा स्वभाव अबोल बनला. या अबोल स्वभावामुळेच इतर कलागुण असूनही फक्त कवी म्हणूनही त्यांना प्रसिद्धी मिळायला वेळ लागला.

भाव्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मनमाड येथे झाले. मॅट्रिकनंतर कॉलेज शिक्षणाला वडिलांकडून विरोध झाल्यामुळे ठाण्याला शॉर्टहँड, टायपिंगचा कोर्स करावा लागला. त्यानंतर भाव्यांनी ठाणे नगर पालिकेत नोकरी धरली. नगरपालिकेत काम करताना 'सन्मित्र' हे साप्ताहिक त्यांच्या वाचनात आले. त्यामध्ये तुझं आहे तुजपाशी हा लेख त्यांनी लिहिला. इथूनच त्यांना लेखनाची स्फूर्ती मिळाली.

साहजिकच लेखनाची ही अंत:प्रेरणा त्यांना स्वस्थ बसू देईना.

**'अंवरी संचरे राष्ट्र निशाण ।**
**भारत अमुचा असे महान''**
**आणि 'भारतमाता मुक्त करू ।**
**निर्धाराने काम करू'**

या साध्या, सरळ आणि बाळबोध कविता रविवार सकाळमध्ये छापून आल्या. रविवार सकाळमध्येच भाव्यांच्या एका कवितेला बक्षीस मिळालं. बक्षीसाची किंमत होती फक्त ३ रू आणि कविता होती 'आशेवर जग तो मानव । चित्र अुद्याचे रंगवी रेखीय' मनमाड सोडून ठाण्याला आल्यावर भावे हळूहळू या क्षेत्रात रमत होते.

भावे यांची रहाणी अतिशय साधी व सरळ होती. दि. १ जून १९४८ रोजी भावे विवाहबद्ध झाले. २५ जून १९४९ या दिवशी पहिला मुलगा झाला. मुलाचं नाव ठेवलं विवेक. त्यानंतर ५ जानेवारी १९५१ आणि १२ जानेवारी १९५४ रोजी आणखी २ मुलगे झाले. विराग आणि विकास !

ठाणे नगरपालिकेत भावे कविवर्य वसंतराव वैद्य यांच्या संपर्कात आले. ठाणे नगरपालिकेत काही दिवस काम करून भावे पी.डब्ल्यू.डी. मध्ये नोकरीला लागले. नंतर मात्र भावे बीई.एस.टी. मध्ये नोकरीला लागले. ते शेवटपर्यंत बीई.एस.टी. मध्येच राहिले.

एकिकडे सांसारीक अडचणी कायम ठाण मांडूनच होत्या. मनुष्य स्वभावाचा नमुना म्हणून एक आठवण सांगण्यासारखी आहे. भाव्यांच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर काही दिवसातच डॉक्टरने बिलाचे पैसे मागितले. अशा वेळेला भाव्यांच्या पत्नीने स्वत:हून आपल्या सोन्याच्या बांगड्या क्षणाचाही विचार न करता भाव्यांकडे दिल्या व डॉक्टरचे पैसे देण्यास सांगितले. क्षणभर भाव्यांनाही काही सुचेना. मात्र तिने त्यांना या बांगड्या मोडून त्या पैशातून डॉक्टरला पैसे द्या. मला कारण पैशासाठी दाराशी माणूस आलेला मला आवडणार नाही असे सांगितले.

प्रापंचिक अडचणींना तोंड देतानाही भावे सतत काही ना काही लिहित राहिले. आई-वडिलांचे छत्र हरपले. नव्या अडचणी, नवी संकट येतच होती.

पहिलं बक्षिस भाव्यांच्या कवितेला तीन रु. चं मिळाल होतं. भारत सरकारने जाहिर केलेल्या हस्तलिखित स्पर्धेत भाव्यांनी पाठवलेल्या **'आपला देश आपलं वागणं'** या हस्तलिखिताला ५०० रु. चं बक्षिस मिळालं. नवप्रौढ साक्षरांसाठी लिहिलेल्या या हस्तलिखिताचं पुस्तक प्रसिद्ध झालं.

एकदा भाव्यांनी सहज दिवाळीत एक रांगोळी चित्र काढलं. त्यानंतर बरीच वर्षे ते दिवाळीचे ३ दिवस वेगवेगळी रांगोळी चित्रं काढत असतं. या मध्येही त्यांना रांगोळी वस्त्रगाळ करून देण्यासाठी पत्नीची मदत होत असे. दशरथ पुजारी यांनी भाव्यांच्या 'गीत कृष्णायन'ला संगीत दिल. या 'गीत कृष्णायन'चा पहिला कार्यक्रम दादरच्या छबिलदास मध्ये झाला. २/३ पेपर्समध्ये सामान्य कार्यक्रम असा रिपोर्ट आलेला

पाहून भावे नाराज झाले. त्यावेळी त्यांना संगीत दिग्दर्शक वसंत देसाई ह्यांनी दोनच वाक्यात सांगितले. 'भावे, राजहंस ऐटीत चालतो म्हणून इतर पक्षांनी चालूच नये असे थोडेच आहे. ज्याने त्याने आपापल्या चालीने चालावे. प्रगती ही केव्हाही आस्ते आस्तेच होत असते.' त्यांन हे वाक्य भाव्यांनी आयुष्यभर लक्षात ठेवलं.

१०/१५ कार्यक्रमानंतर 'गीतकृष्णायन'चे कार्यक्रम बंद झाले. मात्र 'गीतकृष्णायन' मधील 'कृष्णा पुरेना थट्टा कितीही खडा घड्याला मारू नको, या राधेला अडवू नको' हे भाव्यांच्या आयुष्यातलं पहिलं गाणं एच.एम.व्ही.ने रेकॉर्ड केलं. आतापर्यंत भावे राम, कृष्ण, विठ्ठलावरच कविता करीत होते. मग रेडिओवरूनच मागणी आणि प्रेमगीते, विरहगीते, द्वंद्वगीते अशा निरनिराळ्या मूडसच्या गाण्यांची मग तशा प्रकारची गीते करण्यातही भावे यशस्वी होऊ लागले. रेडिओवर मान्यवर कवी म्हणून मान्यता मिळाली. भाव्यांची असंख्य गाणी रेडिओवर ऐकू येऊ लागली. प्रत्येक कवीचं एक तरी गाणं असं असतं की ज्यामुळे तो ओळखला जातो. आशा भोसले यांनी गायिलेल्या 'स्वप्नातल्या कळ्यांनो' या गाण्यामुळे भावे घराघरात पोचले.

निरनिराळ्या तऱ्हेची माणसे भाव्यांना आयुष्यात भेटली. आशा भोसले सारख्या श्रेष्ठ गायिकेने भाव्यांना विचारलं, 'काय भावे, मी गाणं बरोबर गायलं आहे ना?' आणि पुढे स्पष्टीकरणही दिलं. 'तुमच्या गाण्यात जोडाक्षर आहेत म्हणून विचारलं.' एवढ्या मोठ्या गायिकेनं असं विचारलेलं पाहून भावे आश्चर्यचकित झाले. गो. नी. दांडेकरांनी हे गाणं ऐकून भाव्यांच कौतुक केलं होतं. सुलोचना चव्हाण यांच्या आवाजात निघालेल्या चार लावण्यांची ध्वनीमुद्रिका भाव्यांच्या लावण्यांचं एक वेगळंच वैशिष्टय दाखवून गेली.

सुरूवातीच्या काळात स्वत:ला सिद्ध करण्यासाठी भाव्यांनी खूप धडपड केली. ते सकाळी ७ ला घर सोडत ते रात्री ९ ला घरी येत. त्यासाठी त्यांनी साहित्याच्या प्रत्येक क्षेत्रात पाऊल टाकलेलं होतं. 'साहित्य लक्ष्मी' नावाचा दिवाळी अंकासोबत बालवाङ्मय असलेला दिवाळी अंक निघत असे. याचं संपादक पद भाव्यांनी काही वर्ष सांभाळल. ठाण्याहून निघणाऱ्या 'शब्दांगण' मासिकाचेही ते काही वर्ष संपादक होते. या आधी भाव्यांनी 'जटायु' नावाचा दिवाळी अंक काढला. पण त्यावेळेस झालेल्या शारिरीक श्रमांमुळे आणि मानेवर पडलेल्या अती ताणामुळे त्यांना व्हर्टिगोचा त्रास होऊ लागला. 'जटायु' मुळे माझे पंख कापले गेले असं ते म्हणत असत. तशाही स्थितीत साहित्यसेवा चालूच होती. 'रामकृष्ण संगीत गाथा' हा रामकृष्णाच्या जीवनावर तर 'विवेकानंद जयगान' हा विवेकानंदांच्या जीवनावर असे दोन कार्यक्रम त्यांनी केले.

स्पाँडीलॉसिसचा त्रास जवळ जवळ ७।। वर्ष सुरू होता. तशाही परिस्थितीत कवी मन जागरूक ठेवून यावरही त्यांनी कविता केली होती. या त्रासामुळे भाव्यांनी नोकरी सोडली. जय जवान बुक डेपोचे मालक श्री. जोशी यांच्या आग्रहाखातर भाव्यांनी गजानन महाराजांच्या जीवनावर एक पोथी लिहिली. इथे सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे मानेला होणाऱ्या त्रासामुळे ही पोथी भाव्यांनी एक टाकी लिहिली आणि स्पाँडिलॉसिसचा हा त्रास पूर्णपणे नाहीसा झाला.

राजकीय विडंबन गीत 'आवाज' दिवाळी अंकासाठी लिहिणं हे भाव्यांना खूपच समाधान देत असे. याचं कारण म्हणजे भाव्यांनी त्यावेळेस पहिला लेख पाठवला. त्यावेळेस पाटकरांनी स्वत: दत्तू बांदेकरांकडून खातरजमा करून घेतली. त्यावेळेस बांदेकरांनी सांगितलं की या लेखाचं माझ्या लेखनाशी साधर्म्य आहे हे खरं. पण लेख भाव्यांचाच आहे. साहजिकच 'आवाज' दिवाळी अंकामध्ये 'म. पां. भावे' या नावाला त्यांच्या कवितेला कायमचं स्थान मिळालं.

भाव्यांचं जसं नाव होत गेलं तस तसं त्यांना निरनिराळ्या ठिकाणांहून अध्यक्ष किंवा प्रमुख पाहुणे म्हणून बोलावणं येऊ लागलं. नकळत का होईना आपलंही भाष्य दत्तू बांदेकरांइतकंच सरस होतं आहे. याचंही भाव्यांना समाधान वाटलं. प्रकृत्तीच्या तक्रारीमुळे मनासारखे कार्यक्रम करता येत नाहीत याची भाव्यांना खंत वाटे. म. पां. भावे हे कवी म्हणून जास्त परिचित असले तरी जशी जमेल तशी साहित्य सेवा त्यांनी केली. त्यामुळे त्यांच्या नावे लोकनाट्य, नव प्रौढ साक्षरांसाठी, गीत कृष्णायन, रामकृष्ण परमहंस, विवेकानंदांवर गीतरूपी लेखन, दोन कादंबऱ्या, तीन कवितासंग्रह, रामायण, गजानन महाराज, संक्षिप्त पोथी, सायकॉलॉजी ही विविध पुस्तके आहेत. या खेरीज पाच कॅसेटस् व 'आपण ह्यांना पाहिलंत का?' ह्या चित्रपटात दोन गीते आहेत. कितीही संकट आली तरी आणि प्रकृती अस्वास्थ्य असूनही भाव्यांनी जमेल तेवढी आपली लेखणी चालू ठेवली. याचं फलित म्हणूनच आशा भोसलेंसारख्या श्रेष्ठ गायिकेच्या आवाजात **'स्वप्नातल्या कळ्यांनो उमलू**

**नकाच केव्हा'** हे गाणं रेकॉर्ड झालं. गाण्याचं सोनं तर झालंच पण कवी म्हणून त्यांच नावही सर्वांना परिचित झालं. माणिक वर्मा, सुलोचना चव्हाण यांच्या आवाजात गाणी रेकॉर्ड झाली.

भाव्यांना लोक नेहेमी विचारत की, 'तुम्हाला कविता सुचते कशी?' या वरून भाव्यांना 'कथा जीवनाच्या गोष्टी कवितेच्या' या कार्यक्रमाची संकल्पना सुचली.

एकदा संध्याकाळच्या वेळेस बाहेर काही गडबड झाली व पोलिसांनी आर्य क्रिडा मंडळात सोडलेला अश्रूधूर आनंदाश्रम पर्यंत आला. हो झाला त्यावेळी

**'कुणी छेडिती सतार, कुणी झेलिती प्रहार**
**हाती कुणा निखारे, मिळती कुणास हार'**

या कवितेच्या ओळी सुचल्या.

व्हर्टिगोच्या त्रासामुळे भावे वाडिया हॉस्पिटल मध्ये दाखल झाले होते. त्यावेळेस संडाससाठी वगैरे दुसऱ्या वॉर्डातून जावे लागे. त्या वॉर्डातले पेशंट अक्षरश: वेडे म्हणावे असेच होते. त्या वेळेस भाव्यांनी खालील ओळी सुचल्या.

**'किती असंख्य दारूण दु:खे भवती बघतो,**
**मी उगाच माझी दु:खे कुरवाळीतो'**

आणखीन एक भाव्यांच्या मनाला यातना देणारा प्रसंग. भाव्यांनी बहिणीकडे पैसे मागितले. तिने पैसे दिले, मात्र पैसे देताना भाव्यांकडून एका कागदावर लिहून घेतले.

**'जन्म तुझा रे केवळ आहे तुझ्याचसाठी**
**नाती-गोती व्यवहाराची केवळ स्वार्थासाठी'**

भाव्यांच्या मनातली व्यथा या ओळींमधून व्यक्त झाली आहे.

अलिकडेच **'स्वप्नातल्या कळ्यांनो उमलू नका केव्हा'** या गाण्याचे कवी व गाणं कसं सुचलं या विषयी विचारणा करणारे एक पत्र 'लोकसत्ता' मध्ये आलं होतं. या गीताची जन्मकथा तशी साधी आहे. बेस्ट हाऊस ते बोरीबंदर (आता सी.एस.टी.) ऑफीस सुटल्यावर रोज भावे चालत येत असत. एक दिवस असेच चालत येत असताना दोन मुली एकमेकींशी बोलत चालल्या होत्या. त्यांचे संवाद सहजपणे भाव्यांच्या कानावर पडत होते. एक मुलगी दुसरीला सांगत होती की, आपण एखादं स्वप्न रंगवताना खूप मज्जा येते. निरनिराळ्या कल्पनांमध्ये आपण रमून जातो. असं वाटतं की हे कधी संपू नये. पण तेच स्वप्न प्रत्यक्षात खरं झालं की त्यातली गोडी संपून जाते. ते अपूर्ण असते तेच छान असते. हा संवाद भाव्यांच्या कानावर पडला आणि ओळ सुचली 'गोडी अपूर्णतेची लावील वेड जीवा' पण केव्हा तरी 'स्वप्नातल्या कळ्यांनो उमलू नकाच केव्हा'

असं दिसून येतं की शारिरीक व्याधी असो किंवा सांसारिक अडचणी असो, भाव्यांनी सतत स्वत:ला कुठल्याना कुठल्या गोष्टीत व्यस्त ठेवले. म्हणून तर भावे कुलवृत्तांताचं कामही श्री. द. ल. भावे आणि श्री. प्रभाकर भावे यांच्या मदतीने त्यांनी पूर्ण केलं. आयुष्याच्या या वाटचालीत पी. सावळाराम, वसंतराव वैद्य, मंगेश पाडगांवकर, गो. नी. दांडेकर यांच्यापासून ते प्रवीण दवणे ते अशोक बागवे पर्यंत सर्व स्तरावर भाव्यांना स्नेही मिळाले. कुणाशीही बोलताना त्यांच्या बोलण्यात सहजता येत असे. आपला मोठेपणा त्यांनी कधीच मिरवला नाही. आपल्या आतापर्यंतच्या वाटचालीबद्दल ते पूर्णत: समाधानी होते. ठाण्यामध्ये ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना करण्यामध्ये त्यांचा सहभाग होता. ज्येष्ठ नागरिक संघाचे ते ७ वर्षे अध्यक्ष होते. **'वृद्धपणीचे जीवन संगीत असे खुलवा'** हा वृद्धांसाठी त्यांनी लिहिलेला लेख इतका गाजला की त्याच्या झेरॉक्स प्रती निरनिराळ्या ज्येष्ठ नागरिक संघातून वाटल्या गेल्या. लेख आवडल्याची जवळजवळ ६० ते ७० पत्रे आली. संपूर्णपणे विंडबन गीतावर आधारीत **'अरे संसार संसार'** या कार्यक्रमाचे ६० प्रयोग भाव्यांनी केले. तृप्ती भावे, मेधा पोंक्षे, सुबोध गोखले, शिरीष केणकर असे नवोदित गायक घेऊन भाव्यानी या कार्यक्रमाचे ६० प्रयोग केले. २५ व्या कार्यक्रमाच्या वेळेसच तेव्हा लाभलेले अध्यक्ष यशवंत देव यांनी भाव्यांचा 'हा भावे प्रयोग यशस्वी झाला आहे' या एका वाक्यात कार्यक्रमाबद्दल पसंतीची पावती देवून भाव्यांना शाबासकी दिली होती.

आयुष्यात ते सतत स्वत:ला कामात व्यस्त ठेवत राहिले. जे केलं ते फळाची अपेक्षा न ठेवता केलं. या साऱ्याचं फलित म्हणून १-१०-२००२ रोजी ठाणे महानगरपालिकेने **'ठाणे भूषण'** पुरस्काराने त्यांना सन्मानित केल.

या नंतर 'मी हा असा' हे आपलं आत्मचरित्र त्यांनी कोणताही आड पडदा न ठेवता अतिशय प्रांजळपणे लिहिलं. २५ मार्च २००३ रोजी हे आत्मचरित्र पुस्तकरूपाने प्रकाशित झालं आणि १९ मे २००३ रोजी कवी म. पां. भावे यांच निधन झालं. आज जरी ते आपल्यात नसले तरी **'स्वप्नातल्या कळ्यांनो'** या गाण्यामुळे आणि भावे कुलवृत्तांताच्या रूपाने त्यांची आठवण आपल्या मनात सदैव राहिल.